९२७९०/९८

कायम विनाअनुदान तत्वावर
(माध्यम इंग्रजी)

जाक्रप्रा.प्राशि-३/खाप्राशा/मा.इंग्रजी/१०-११
शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे-१, यांचे कार्यालय.
दिनांक : 11 JUN 2010

प्रति

१. शिक्षणाधिकारी (प्राथमिक),
जिल्हा परिषद,

२. शिक्षण प्रमुख/प्रशासन अधिकारी
महानगरपालिका/नगरपालिका शिक्षण मंडळ,पिंपरी चिंचवड,पुणे.

विषय : सन २००३ - २००४ या शैक्षणिक वर्षात नविन खाजगी प्राथमिक शाळेस परवानगी देणेबाबत.(माध्यम - इंग्रजी) . . .

संदर्भ: १.शालेय शिक्षण विभागाकडील पत्र क्रमांक व्हीएलएस १००३/(५०९/२००३)/प्राशि ३/दिनांक २४ जून २००२
२.आपले पत्र क्र.शिक्षण/खाप्राशा/३/कावि/३०२/२०१०
दिनांक २९/५/२०१०

उपरोक्त विषयासंबंधीचे आपल्या कार्यालयास पृष्ठांकित केलेले शासनाकडील संदर्भाधिन पत्र कृपया अवलोकनी घ्यावे.

याबाबत कळविण्यात येतें की, स्थानिक गरज लक्षात घेऊन खाली नमूद केलेल्या संस्थेला तिच्या नावासमोर दर्शविलेल्या ठिकाणी व माध्यमातून जून २००३ पासून इ. १ ली च्या वर्गास (फक्त एका तुकडीस) सन २००३-२००४ या शैक्षणिक वर्षात शाळा सुरु करण्यास खाली नमूद केलेल्या अटींची पूर्तता करण्याच्या शर्तीवर खाजगी प्राथमिक शाळेस **कायम विनाअनुदान तत्वावर** भविष्यात माध्यम बदलता येणार नाही या अटीवर परवानगी देण्यात येत आहे.

| अ. क्र. | संस्थेचे नांव | शाळेचे नांव व ठिकाण | इयत्ता | माध्यम | कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| १. | २. | ३. | ४. | ५. | ६ |
| १ | किलबिल एज्यु.सोसा. जनवाडी,पुणे | किलबिल प्रायमरी स्कूल,पिंपळगुरव,पुणे | १ ली | इंग्रजी | जून २००३ पासून |

**सदर परवानगी खालील शर्ती व अटींवर अवलंबून आहे. त्याचा भंग झाल्यास शाळा परवानगी आपोआप रद्द होईल.**

३.१ सदर संस्था, नोंदणी अधिनियम १८६० व मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत किंवा केवळ मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत असली पाहिजे.

३.२ शाळेची इमारत व परिसर शिक्षणाकूल, स्वच्छ व सुरक्षित असला पाहिजे.

३.३ शाळेत शासनाने वेळोवेळी विहित केल्यानुसार शैक्षणिक व व्यावसायिक अर्हतेचा आवश्यक सक्षम कर्मचारीवृंद शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या वेतनश्रेण्या व सेवाशर्तीच्या अधिन राहून नेमला पाहिजे.

३.४ संस्थेची आर्थिक परिस्थिती, संस्थेकडील भौतिक सुविधा, व्यवस्थापनाविषयक सुविधा इत्यादी, शाळा व्यवस्थित चालण्यासाठी सुयोग्य असणे आवश्यक आहे.

३.५ संस्थेने या शाळेमध्ये शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या अभ्यासक्रमांची अंमलबजावणी केली पाहिजे. तसेच अभ्यासक्रम, पाठ्यपुस्तके, मुल्यमापन पध्दती, शालेय व सहशालेय कार्यक्रम आणि उपक्रम यांचे सुयोग्यतेने कार्यान्वित केले पाहिजे व त्यासाठी आवश्यक सर्व सुविधा पुरविल्या पाहिजे.

३.६ संस्थेने शाळेतील विद्यार्थ्यांसाठी/कर्मचाऱ्यांसाठी विहित नोंदवह्या अद्ययावत आणि विश्वासार्ह स्वरुपात कार्यान्वित ठेवल्या पाहिजेत.

३.७ संस्थेने शाळेतील वातावरण शिक्षणानुकूल ठेवणे आवश्यक आहे. तसेच शाळेतील विद्यार्थ्यांमध्ये विधायक शिस्त निर्माण करणे, तसेच वक्तशीरपणा, नियमितपणा आणि नियमित उपस्थिती या गोष्टी त्यांच्यावर बिंबवणे आवश्यक आहे.

TRUE COPY
PRINCIPAL
KILBIL PRIMARY SCHOOL
PIMPLE GURAV PUNE-61.
KILBIL SECONDARY SCHOOL
PIMPLE GURAV PUNE-61

शिक्षण मंडळ कार्यालय,
पिंपरी-चिंचवड महानगरपालिका,पिंपरी-१८
क्रं - शिक्षण/खाप्राशा/३/कावि/३२९/२०१०
दिनांक :- १९ /०८/२०१०

प्रति,
मुख्याध्यापिका,
किलबील प्रायमरी स्कूल,
पिंपळे गुरव, पुणे-२७

विषयः- इ. २ री ते इ. ७ वी पर्यंतचे प्रत्येकी प्रथम वर्गांना सन २०१०-११ या शैक्षणिक वर्षात मंजूरी देणेबाबत...

संदर्भः- १) शासन निर्णय क्रं. पीएलएस/१००२/(१०००/०२)/प्राशि-३, दि:- १४/०१/०३
२) आपणांकडील दिनांकः- १३/०७/२०१० चा प्रस्ताव.

संदर्भांकित पत्रास अनुसरुन आपणाकडून प्राप्त झालेला प्रस्ताव विचारात घेता खाली नमूद इयत्तेच्या नैसर्गिक वाढीचे वर्ग/अतिरिक्त तुकडी खाली दर्शविण्यात आलेल्या अटी व शर्तीच्या अधिन राहून मंजूर करण्यात येत आहे.

| क्रं. | शाळेचे नांव व पत्ता | माध्यम | इयत्ता | वर्ग/तुकडी वाढ प्रकार | कायम विना अनुदान तत्वावर |
|---|---|---|---|---|---|
| १ | किलबील प्रायमरी स्कूल, पिंपळे गुरव, पुणे-२७ | इंग्रजी | इ. २ री ते इ. ७ वी पर्यंचे प्रत्येकी प्रथम वर्ग | नैसर्गिक | इ. २ री ते इ. ७ वी पर्यंतचे प्रत्येकी प्रथम वर्ग २०१०-११ या शैक्षणिक वर्षात मंजूर. |

शाळेने सदरचे वर्ग/तुकडी मंजूरीसाठी खाली नमूद केलेल्या अटीची पूर्तता करणे आवश्यक आहे.

अटी व शर्ती :-

१) शाळेत शासनाने वेळोवेळी विहीत केल्यानुसार शैक्षणिक व व्यावसायिक अर्हतेचा आवश्यक सक्षम कर्मचारी वृंद शासनाने वेळोवेळी विहीत केलेल्या वेतनश्रेण्या व सेवा शर्तीच्या अधिन राहून नेमला पाहिजे (एचएससी डी.एड/एसएससी डी.एड.)
२) सदर शाळेने तुकडयासाठी सर्व भौतिक, शैक्षणिक व व्यवस्थापन विषयक सुविधा उपलब्ध करुन द्यावयास पाहिजे.
३) सदर शाळेंने स्वच्छता गृहाची व पिण्याच्या पाण्याची सोय चांगली केलेली असावी.
४) शाळेने शासनाने वेळोवेळी विहीत केलेल्या अभ्यासक्रमाची अमंलबजावणी केली पाहिजे.
५) सदर मंजूर करण्यात येणा-या तुकडीमुळे परिसरातील इतर मान्यताप्राप्त प्राथमिक शाळेतील पदावर विपरीत परिणाम होणार नाही, याची खबरदारी घेणे आवश्यक आहे.
६) सदर शाळेच्या तुंकडीस विद्यार्थी संख्या नियमबाह्य निदर्शनास आल्यास तुकडी/वर्ग मान्यता रद्द करण्यात येईल.
७) शाळेत आगप्रतिबंधक सुविधांची व्यवस्था तात्काळ करण्यात यावी.

प्रशासन अधिकारी
शिक्षण मंडळ
पिंपरी-चिंचवड महानगरपालिका
पिंपरी, पुणे-१८

प्रतः- १) माहितीसाठी- मा. शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे-०१.

TRUE COPY

PRINCIPAL
KILBIL SECONDARY SCHOOL
PIMPLE GURAV PUNE-61

PRINCIPAL
KILBIL PRIMARY SCHOOL
PIMPLE GURAV PUNE-61